# पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) योजना, २०२६ (मसुदा)

पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम २०१४ मधील तरतुदींच्या अनुषंगाने नगर विकास विभाग शासन निर्णय दि. २० एप्रिल २०२६ अन्वये पथविक्रेता योजना मसुदा समितीने पथविक्रेता योजनेचा मसुदा तयार केला असून तो खालीलप्रमाणे आहे:-

## १. प्रारंभिक

१.१. या योजनेस, पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) योजना, २०२६ असे संबोधण्यात येईल.

**१.२.** "पथविक्रेते", "विक्रीप्रक्षेत्र, "पथविक्रेत्यांसाठी योजना", "नगर पथविक्री समिती", "स्वाभाविक बाजार" हे शब्द व शब्दप्रयोग आणि अन्य संज्ञा यांना "पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथ विक्रीचे विनियमन) अधिनियम, २०१४ यामध्ये आणि पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथ विक्रीचे नियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६ यामध्ये जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल.

१.३. अधिनियम आणि नियम यानुसार पथविक्रेत्याचा व्यवसाय करण्यासाठी पोषक वातावरण पुरविणे व त्यास चालना देणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

## २. सर्वेक्षण

### २.१. सर्वेक्षण करणे :-

पथविक्रेत्यांच्या प्रथम सर्वेक्षणास पाच वर्ष पूर्ण झालेली आहेत अशा ठिकाणी विद्यमान सर्व पथविक्रेत्यांचे सर्वसमावेशक द्वितीय सर्वेक्षण पथविक्रेता योजना अधिसूचित झाल्यापासून नगर पथविक्रेता समितीमार्फत ६ महिन्यात सुरु करण्यात येईल. सर्वेक्षणाशी संबंधित नियोजन, प्रचलन, देखरेख, पर्यवेक्षण करणे इत्यादींबाबतची जबाबदारी नगर पथविक्रेता समितीची असेल. त्यानंतर नगर पथविक्रेता समितीमार्फत दर पाच वर्षांनी पुन:सर्वेक्षण करण्यात येईल.

### २.२. सर्वेक्षणाची प्रसिध्दी :-

नगर पथविक्रेता समितीमार्फत प्रस्तावित सर्वेक्षणाची पध्दत, सर्वेक्षणास आवश्यक असलेली कागदपत्रे, सर्वेक्षणाचे नियोजन आणि सर्वेक्षण सुरु करण्याबाबत १५ दिवस अगोदर पर्याप्त प्रसिध्दी खालील माध्यमातून देण्यात येईल. उदाहरणार्थ:- दैनिक वर्तमान पत्र, रेडीओ, सामाजिक माध्यमे, स्थानिक प्राधिकरणाचे संकेतस्थळ, स्थानिक प्राधिकरणाचे मुख्यालय, वार्ड कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर, बाजारपेठ, विक्री क्षेत्र व ज्या ठिकाणी पथविक्रेते विक्री करतात अशा ठिकाणावर फलक व पत्रकाद्वारे.

### २.३. सर्वेक्षण करण्याची पध्दत :-

i. नगर पथविक्रेता समिती अधिनियमातील तरतुदींप्रमाणे कार्यरत असलेल्या पथविक्रेत्यांचे अचूक सर्वेक्षण करील.

ii. नगर पथविक्रेता समितीने विद्यमान सर्व पथविक्रेत्यांचे सर्वसमावेशक सर्वेक्षण सुरु केल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यात सर्वेक्षण पूर्ण करेल. परिशिष्ट-१ मधील नमुन्यात माहिती गोळा करुन डिजिटल पध्दतीने हे सर्वेक्षण करण्यात येईल. नगर पथविक्रेता समिती विहित नमुन्यापेक्षा अधिक असलेली कोणतीही अतिरिक्त माहिती संकलित करण्याची आवश्यकता विहित करणार नाही. निर्देशक स्वरुपाचा आदर्श सर्वेक्षण नमुना परिशिष्ट-१ म्हणून सोबत जोडलेला आहे.

iii. पथविक्रेत्यांकडून सर्वेक्षणादरम्यान घ्यावयाची कागदपत्रे: आधार कार्ड, रेशन कार्ड, विक्री प्रमाणपत्र (असल्यास), जातीचा दाखला (लागू असल्यास), दिव्यांग दाखला (लागू असल्यास), एकल महिला-स्वयंघोषणा पत्र (लागू असल्यास), सध्या राहत असलेल्या पत्याचा उपलब्ध पुरावा उदा. भाडे करार/ बँक पासबुक/ लाइट बिल इत्यादि शासकीय पुराव्यांपैकी .

iv. नगर पथविक्रेता समिती कागदपत्रे अपूर्ण असल्यास पथविक्रेत्यांना सदर कागदपत्रे कोठे व किती दिवसात जमा करावयाची याची माहिती देईल.

v. राज्यस्तरावर किंवा स्थानिक प्राधिकरण स्तरावर पथविक्रेत्यांचे छायाचित्र सर्वेक्षण, नोंदणी सर्वेक्षण, आणि स्थिर पथविक्रेत्यांचे जिओ-टॅगिंग व फिरत्या पथविक्रेत्यांचे जिओ-फेन्स करण्यासाठी वेब ॲप्लिकेशन्स आणि मोबाईल ॲप्लिकेशन्स सक्षम असलेल्या व्यावसायिक एजन्सीच्या सहाय्याने विकसित करण्यात येईल. यामध्ये पथविक्रेता सर्वेक्षणामध्ये एकाच पथविक्रेत्याची माहिती दोन वेळा गोळा होऊन माहितीची पुनरावृत्ती टाळण्यासाठी आधार कार्डशी संलग्नित मोबाईल क्रमांक वरील OTP घेऊन किंवा बायोमेट्रिक आधारे मोबाईल ॲपद्वारे सर्वेक्षण करण्यात येईल. ज्यामधून सर्वेक्षण पूर्ण झालेल्या पथविक्रेत्याचा स्थानिक प्राधिकरणनिहाय युनिक नंबर तयार होईल. ओळखपत्रे किंवा स्मार्ट कार्ड आणि विक्री प्रमाणपत्रे जारी करण्याची एक व्यापक प्रणाली तसेच विश्लेषणात्मक जीआयएस-आधारित विक्री क्षेत्र योजना तयार करण्याच्या दृष्टीकोनातून वेब ॲप्लिकेशन विकसित करण्यात येईल.

vi. नगर पथविक्रेता समिती पथविक्रेत्यांचे सर्वेक्षण करण्यास सक्षम असलेल्या व्यावसायिक एजन्सीच्या सेवा बाह्यस्रोत तत्त्वावर घेऊन किंवा शहरातील विविध अभियानात निर्माण झालेले बचत गट, संसाधन व्यक्ती यांच्याद्वारे करू शकतील.

vii. नगर पथविक्रेता समिती सर्व पथविक्रेत्यांचे सर्वेक्षण होण्याच्या दृष्टीने सर्वेक्षणाची वेळ व कालावधी निश्चित करून विहित मुदतीत सर्वेक्षण पूर्ण करेल.

viii. नगर पथविक्रेता समितीमार्फत सर्वेक्षण पूर्ण झालेल्या पथविक्रेत्यास त्याची पावती देईल.

ix. नगर पथविक्रेता समितीद्वारे पथविक्रेता सर्वेक्षणाचे सनियंत्रण करण्यात येईल.

x. नगर पथविक्रेता समिती सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर सर्वेक्षणात आढळलेल्या पथविक्रेत्यांच्या यादीची १५ दिवसांच्या कालावधीत पडताळणी करून, नोंदणी यशस्वी झालेल्या पथविक्रेत्यांची यादी डिजिटल पध्दतीने व आवश्यकता असल्यास ही यादी मुद्रीत स्वरुपात प्रसिध्द करेल.

xi. नगर पथविक्रेता समितीकडून यादी प्रसिध्द केल्यानंतर प्रसिध्दीच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या कालावधीमध्ये हरकती व सूचना मागविण्यात येतील. सदर हरकती विचारात घेऊन हरकती व सूचना सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकापासून ३० दिवसांत नगर पथविक्रेता समिती नोंदणीकृत पथविक्रेत्यांची अंतिम यादी प्रसिध्द करेल.

xii. जोपर्यंत सर्वेक्षण पूर्ण होत नाही आणि सर्व पात्र पथविक्रेत्यांना विक्रीचे प्रमाणपत्र जारी केले जात नाही, तोपर्यंत कोणत्याही पथविक्रेत्याला निष्कासित केले जाणार नाही.

**२.४. पथविक्रेता म्हणून नोंदणी करण्यासाठीचे पात्रता निकष :-**

i. तो/ती भारताचा नागरिक असावा/असावी

ii. पथविक्रेत्याचे वय १८ वर्षापेक्षा कमी असणार नाही.

iii. पथविक्री खेरीज उपजीविकेची इतर कोणतीही साधने असणार नाहीत.

**२.५. पथविक्रेता म्हणून नोंदणी केल्यामुळे पथविक्री करण्याचा हक्क प्रदान न होणे**

नगर पथविक्रेता समितीमार्फत विक्री प्रमाणपत्र आणि ओळखपत्र दिल्याशिवाय केवळ पथविक्रेता म्हणून नोंदणी केल्यामुळे / यशस्वीरीत्या नोंदणीकृत पथविक्रेता यादीमध्ये नाव प्रसिध्द झाल्यामुळे पथविक्री करण्याचा कोणताही हक्क प्रदान होत नाही.

**२.६. पथविक्रेत्यांची माहिती (Database) :-**

राज्यस्तरावर किंवा स्थानिक प्राधिकरणस्तरावर डिजिटल पध्दतीने सर्व पथविक्रेत्यांची माहिती (Database) ठेवण्यात येईल.

## ३. विक्री प्रमाणपत्र आणि ओळखपत्र

**३.१. विक्री प्रमाणपत्रासाठी निकष :-**

i. तो/ती भारताचा नागरिक असावा/असावी

ii. पथविक्रेत्याचे वय १८ वर्षापेक्षा कमी असणार नाही.

iii. पथविक्री खेरीज उपजीविकेची इतर कोणतीही साधने असणार नाहीत.

iv. नोंदणीकृत पथविक्रेता यादीमध्ये नाव असावे.

**३.२. विक्री प्रमाणपत्र निर्गमित करण्याच्या अटी व शर्ती :-**

**३.२.१. विक्री प्रमाणपत्र हे खालील नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येईल :-**

i. योजना अधिसूचित झाल्याच्या दिनांकापासून ९० दिवसात स्थानिक प्राधिकरण, पथविक्रेता आराखडा तयार करेल. पथविक्रेता आराखडा अधिसूचित झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसात नोंदणीकृत पात्र पथविक्रेत्यांना नगर पथविक्रेता समितीकडून अधिनियम, नियम व योजना यांमधील नमूद अटी व शर्तीच्या पुर्ततेनंतर विक्री प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येईल.

तथापि पुढे दर पाच वर्षानंतर होणाऱ्या पथविक्रेता सर्वेक्षणानंतर ६० दिवसात विक्री प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.

ii. पथविक्रेता, विक्रीच्या ठिकाणी विक्री प्रमाणपत्र ठळकपणे लावील. विक्रेता, विक्री करण्याच्या संपूर्ण कालावधीमध्ये ओळखपत्र सुध्दा जवळ बाळगील.

iii. विक्रीकरीता निश्चित केलेल्या कालावधीमध्येच विक्री करता येईल.

iv. विक्री प्रमाणपत्र हे अहस्तांतरणीय असेल आणि कोणत्याही परिस्थितीत ते मक्त्याने, भाडेपट्टयाने देता येणार नाही, त्याची विक्री किंवा हस्तांतरण करता येणार नाही.

v. जागेवर कोणत्याही प्रकारच्या तात्पुरत्या / कायमस्वरुपी संरचना / बांधकाम करण्यास परवानगी असणार नाही. पथविक्रेत्याने त्याला वाटप केलेल्या जागेतच सर्व विक्रीचा माल ठेवला पाहिजे. विक्रीच्या जागेवर कोणतेही प्रक्षेपण करण्यास, विस्तार करण्यास परवानगी असणार नाही. तथापि, जमिनीवर किंवा भिंतींवर कायमस्वरुपी बांधलेल्या नसतील अशा छत्र्या /छपऱ्या यांचा वापर विक्रेते करु शकतात.

vi. ज्याला विक्री प्रमाणपत्र देण्यात आले आहे अशा विक्रेत्याने, स्थानिक प्राधिकरणाने विहित केलेले दैनंदिन / मासिक/ वार्षिक विक्री शुल्क अदा करणे आवश्यक असेल.

vii. विनिर्दिष्ट कालावधीमध्ये कोणत्याही कारणास्तव विक्री करण्यास असमर्थता हे विक्रीचे दैनंदिन / मासिक/ वार्षिक शुल्क प्रदान न करण्याचे किंवा सूट मिळण्याचे कारण ठरणार नाही. तथापि अपवादात्मक परिस्थितीत विक्री शुल्कामध्ये सूट देण्याबाबत स्थानिक प्राधिकरण निर्णय घेईल.

viii. कोणत्याही परिस्थितीत पथविक्रेता विक्रीची जागा पोट भाडेपट्टयाने देणार नाही.

ix. लोकहितास्तव / न्यायालयीन आदेशानुसार पथ विक्रेत्यावर निर्बंध घालण्याचा, त्याला निष्कासित करण्याचा किंवा विस्थापित करण्याचा हक्क स्थानिक प्राधिकरणाकडे निहित असेल. पथविक्रेता नोटीस मिळाल्यानंतर तात्काळ जागा रिकामी करील.

x. पथविक्रेता विक्री प्रक्षेत्रातील / क्षेत्रातील कचऱ्याची एकत्रितपणे विल्हेवाट लावण्याकरीता चालना देण्यास योगदान देईल. विक्रेता कोणताही कचरा गटारात, रस्त्याच्या कडेला, खुल्या क्षेत्रात किंवा अन्य कोणत्याही ठिकाणी अनधिकृतपणे रचून ठेवणार नाही.

xi. पथविक्रेता त्यांना नेमून दिलेल्या जागेचाच वापर करील. रहदारी / पादचारी किंवा यांत्रिक / बिगर यांत्रिक वाहने यांच्या सुरळीत वाहतुकीमध्ये कोणताही अडथळा आणणार नाही.

xii. पथविक्रेता उपद्रवी, धोकादायक व प्रदुषणकारी वस्तु विकणार नाही. उत्पादनाचा व जनतेला देण्यात येणाऱ्या सेवांचा दर्जा, सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता व सुरक्षितता यासाठी निर्धारीत केलेल्या मानकांनुसार असल्याची सुनिश्चिती विक्रेता करेल.

xiii. विक्रीची परवानगी रद्द केल्यावर / समाप्त झाल्यावर पथविक्रेता ती जागा शांततापूर्ण रीतीने तात्काळ रिकामी करील.

xiv. वेळ वाटणी तत्वावर विक्री प्रमाणपत्र प्रदान केले असल्यास, त्यानुसार विक्रीची वेळ समाप्त झाल्यावर पथविक्रेता पथविक्रीची जागा दररोज रिकामी करेल.

xv. पथविक्रेता विक्री क्षेत्रामधील सार्वजनिक सोयी सुविधा व सार्वजनिक मालमत्ता चांगल्या सुस्थितीत ठेवेल, त्यास नुकसान पोहचविणार नाही, नष्ट करणार नाही व त्यास हानी पोहचविणार नाही.

**३.२.२. विक्री प्रमाणपत्र प्रदान करण्यापूर्वी पथविक्रेता नगर पथविक्रेता समितीकडे खालील स्वयंघोषणा पत्र सादर करेल. (परिशिष्ट - ४ नुसार): -**

i. पथविक्रेता स्वत: किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्यांमार्फत विक्री करेल, ज्यांचे वय अठरा वर्षांपेक्षा कमी नसेल.

ii. पथविक्रीशिवाय उपजीविकेचे दुसरे कोणतेही साधन नाही व इतर कोणत्याही ठिकाणी दुसरे कोणतेही पथविक्री करीत नाही.

iii. विक्री व्यवसायांशी संबंधित जागा, भाडे किंवा विक्री प्रमाणपत्र कोणत्याही प्रकारे इतर कोणत्याही व्यक्तीला हस्तांतरित करणार नाही किंवा त्याचा ताबा देणार नाही.

iv. तो/ ती कोणत्याही संसर्गजन्य रोगामुळे बाधीत नाही.

v. विक्रीच्या जागेवर / प्रक्षेत्रात व आजुबाजूच्या क्षेत्रात स्वच्छता व सार्वजनिक आरोग्य राखील.

**३.२.३. पथविक्रेत्यांसाठी सार्वजनिक आरोग्य आणि स्वच्छता राखण्यासाठी अटी व शर्ती**

i. प्रत्येक पथविक्रेता विक्री क्षेत्रात विक्रेत्यांसाठी वाटप केलेल्या क्षेत्राच्या तात्काळ परिसराच्या स्वच्छतेसाठी जबाबदार असेल.

ii. प्रत्येक पथविक्रेत्याने स्थानिक प्राधिकरणाच्या निर्देशानुसार आपल्या व्यवसायातून निर्माण होणारा कचरा गोळा करून त्यावर प्रक्रिया करावी.

iii. प्रत्येक पथविक्रेत्याने घनकचरा व्यवस्थापनासाठी देखभाल शुल्क, स्थानिक प्राधिकरणाने आकारल्याप्रमाणे, संबंधित स्थानिक प्राधिकरणाकडे जमा करावे.

iv. जर स्थानिक प्राधिकरण कचरा संकलन आणि विल्हेवाट लावण्यासाठी व्यवस्था करत असेल तर पथविक्रेता त्याचा खर्च देण्यास जबाबदार आहे.

v. पथविक्रेत्यास दुर्गंधीयुक्त, धोकादायक आणि प्रदूषणकारी वस्तू विकता येणार नाहीत.

vi. खाद्यपदार्थ विकणाऱ्या पथविक्रेत्यांनी संबंधित प्राधिकरणाकडून अन्न सुरक्षा प्रमाणपत्र प्राप्त करणे आणि ते प्रदर्शित करणे बंधनकारक असेल.

### ३.३. नगर पथविक्रेता समितीमार्फत पथविक्रेता प्रमाणपत्र देण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे :-

i. विक्री प्रमाणपत्र प्रदान करताना दिव्यांग, विधवा व एकल माता तसेच अंत्योदय कार्ड धारक व तृतीयपंथीय या व्यक्तींना प्राधान्य देण्यात येईल. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग, महिला व अल्पसंख्याक यांना देखील प्राधान्य देण्यात येईल. नगर पथविक्रेता समिती स्थानिक परिस्थितीनुसार प्राधान्यक्रम निश्चित करेल.

ii. जर अर्जांची संख्या विक्री जागांच्या / ठिकाणांच्या उपलब्ध संख्येपेक्षा अधिक असल्यास चिठ्ठया टाकून सोडतीद्वारे / संगणक किंवा अशा कोणत्याही तत्सम पद्धतीने वाटप केले जाईल. उर्वरित पथविक्रेत्यांना उपलब्ध इतर विक्री प्रक्षेत्रामध्ये समायोजित केले जाईल

iii. पात्र पथविक्रेत्यांना विक्री प्रक्षेत्रातील जागा सोडतीद्वारे वाटप करण्यात येतील.

iv. एखाद्या कुटुंबातील एकापेक्षा अधिक व्यक्तीला (नवरा व बायको आणि अवलंबित मुले यांचे मिळून बनलेले कुटुंब) विक्री प्रमाणपत्र देण्यात येऊ नये.

v. ज्यांची उपजीविका न्यायालयाच्या अधिनिर्णयामुळे बाधित झालेली आहे आणि त्यांच्या पुनर्वसनाकरीता योजना तयार करण्यासाठी राज्य शासनास निर्देश देण्यात आलेले आहे अशा व्यक्तींना पथविक्रीच्या निकषांची पूर्तता करण्याच्या अधीन राहून प्राधान्य देण्यात येईल.

vi. उत्सव हंगाम / मेळा इत्यादी तात्पुरत्या कालावधीसाठी विक्रेत्याला विक्री करण्यासाठी स्थानिक प्राधिकरणाद्वारे विहीत करण्यात येईल अशा नमुन्यात किमान आठ दिवसा अगोदर नगर पथविक्रेता समितीकडे अर्जदार अर्ज करील. नगर पथविक्रेता समिती संबधित अर्जावर निर्णय घेईल.

vii. ज्या पथविक्रेत्याला विक्री प्रमाणपत्र दिले आहे, त्याचा मृत्यू झाल्यास किंवा त्याला कोणतेही कायमचे अपंगत्व आल्यास किंवा तो आजारी पडल्यास, विक्री प्रमाणपत्राची वैधता संपेपर्यंत, त्याच्या कुटुंबातील खालील प्राधान्यक्रमानुसार सदस्य त्याच्या जागी विक्री करेल

(अ) पथविक्रेत्याची पत्नी/पती;

(ब) पथविक्रेत्याचे अवलंबून असलेले मुलगा / मुलगी:

viii. अधिनियम २०१४ च्या अगोदर ज्या पथविक्रेत्यांना विक्रीचे प्रमाणपत्र जारी केले गेले आहे, मग ते परवाना किंवा इतर कोणत्याही स्वरुपाची परवानगी म्हणून ओळखले जात असले तरी ( स्थिर विक्रेता किंवा फिरता विक्रेता किंवा इतर कोणत्याही प्रवर्गांतर्गत) ती व्यक्ती ज्या कालावधीसाठी तिला असे विक्रीचे प्रमाणपत्र जारी केले गेले आहे त्या कालावधीसाठी त्या प्रवर्गातील पथविक्रेता मानली जाईल. जरी पथविक्रेता सर्वेक्षणात समाविष्ट असो वा नसो.

ix. नगर पथ विक्रेता समितीने दोन सर्वेक्षणादरम्यान विक्री प्रमाणपत्र प्रदान करण्यासाठी करावयाची कार्यवाही: नगर पथविक्रेता समितीकडे सर्वेक्षणात समाविष्ट न झालेला व पुढील सर्वेक्षण होण्याच्या अगोदर पथविक्री करण्यास इच्छुक असलेले पथविक्रेते अर्ज करतील. नगर पथविक्रेता समितीने अशा पथविक्रेत्याची संपूर्ण माहिती घेऊन विक्री प्रक्षेत्रामध्ये शिल्लक

असलेल्या जागेच्या आधारे व विक्री प्रमाणपत्र प्रदान करण्यासाठीच्या आवश्यक अटी व शर्थीच्या अधीन राहून विक्री प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत निर्णय घेईल.

x. **विक्री प्रमाणपत्राचे शुल्क :**

| | |
|---|---|
| अ) महानगरपालिका वर्ग अ+ आणि अ : | रु. १०००/- |
| आ) महानगरपालिका वर्ग ब आणि क : | रु. ५००/- |
| इ) महानगरपालिका वर्ग ड आणि नगरपरिषद वर्ग अ: | रु. ३००/- |
| ई) नगरपरिषद वर्ग ब आणि क : | रु. २००/- |
| उ) नगरपंचायत : | रु.१००/- |

**३.४. पथविक्रेत्यास विक्री प्रमाणपत्र देण्याचा नमूना व पध्दती :-**

**३.४.१. नगर पथविक्रेता समिती विक्री प्रमाणपत्र देण्याबाबत विहित केलेल्या नियमावलीस अनुसरुन, खालीलपैकी कोणत्याही प्रकारात विक्री प्रमाणपत्र देईल.:-**

(अ) **कौशल्य किंवा सेवा विक्री करणारे**: एखादे कौशल्य किंवा सेवा विकणारे विक्रेते, उदाहरणार्थ:- केशकर्तनालय, वस्तु दुरुस्ती इत्यादी.

(आ) **वस्तु व माल विक्री**: मूल्यवर्धन करून किंवा न करता उत्पादने किंवा वस्तू विकणारे. उदा: शिजवलेले अन्न विक्रेते, फळे/ भाजीपाला विक्रेते वस्तु व माल विक्रेते इत्यादी.

**३.४.२. वरील प्रवर्गांतर्गत, विक्रेत्यांची खालीलप्रमाणे वर्गवारी केली जाईल:-**

(अ) **स्थिर विक्रेते**:- एका विशिष्ट ठिकाणी वस्तू, माल किंवा सेवा विकण्याचा व्यवसाय करणाऱ्या व्यक्ती.

i. स्थिर विक्रेते : पूर्णवेळ

ii. स्थिर विक्रेते : अंशकालिक किंवा वेळ-वाटणी पद्धतीने

(आ) **फिरते विक्रेते**:

i. फिरता विक्रेता (मोटार वाहनासह): अशा व्यक्ती ज्या कोणत्याही प्रकारच्या मोटार वाहनांचा वापर करून वस्तू, माल किंवा सेवा विकण्याचा व्यवसाय करतात, ज्या वाहनांच्या संचालनासाठी किंवा हालचालीसाठी मोटार वाहन अधिनियम, १९८८ (केंद्रीय अधिनियम ५९, १९८८) किंवा प्रचलित असलेल्या इतर कोणत्याही कायद्यानुसार परवाना आवश्यक असतो.

ii. फिरता विक्रेता (मोटार नसलेले वाहन): हाताने ओढलेल्या किंवा पेडलने चालणाऱ्या वाहनांचा किंवा प्राण्यांच्या शक्तीवर चालणाऱ्या वाहनांचा वापर करून वस्तू किंवा सेवा वाहून नेणे, जी वाहने मोटार वाहन अधिनियम, १९८८ (केंद्रीय अधिनियम ५९, १९८८) च्या कक्षेत येत नाहीत आणि ज्यांच्यासाठी सध्या अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यानुसार वाहन चालवण्याचा परवाना आवश्यक नाही.

iii. फिरते विक्रेते (डोक्यावरचा माल): अशा व्यक्ती ज्या एका विशिष्ट मार्गावर एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी फिरून वस्तू, माल किंवा सेवा विकण्याचा व्यवसाय करतात आणि त्या वस्तू व

माल आणि विक्रीसाठी वापरले जाणारे साहित्य किंवा इतर साधने मानवी श्रमाने, विशेषतः डोक्यावर वाहून नेतात.

(इ) **हंगामी व इतर**: संबंधित नगर पथविक्रेता समिती पथविक्रेत्यांच्या इतर श्रेणी देखील निश्चित करू शकते, जसे की,-

i. आठवडी बाजारातील विक्रेते;
ii. पारंपरिक बाजारांमधील विक्रेते;
iii. रात्रीच्या बाजारातील विक्रेते;
iv. उत्सव बाजार किंवा कार्यक्रमांमधील तात्पुरते विक्रेते.
v. इतर हंगामी विक्रेते

नगर पथविक्रेता समिती अशा विक्रेत्यांना त्यांचा व्यवसाय चालू ठेवता यावा यासाठी त्यांच्या एकत्रीकरणाची किंवा त्यांच्यासाठी स्वतंत्र सुविधेची तरतूद करू शकते.

**३.५.** पथविक्रेत्याला, परिशिष्ट-२ मध्ये असलेल्या नमुन्यामध्ये विक्री प्रमाणपत्र देण्यात येईल.

**३.६.** पथविक्रेत्याने विक्रेता म्हणून नोंदणी अर्जामध्ये घोषित केलेल्या निवासी पत्यावर नोंदणीकृत डाकेने / शीघ्र डाकेने / हातबटवड्याने / इतर प्रचलित पध्दतीद्वारे विक्रेत्याला विक्री प्रमाणपत्र देण्यात येईल.

**३.७.** पथविक्रेत्यांना ओळखपत्रे देण्याचा नमुना व त्याची पध्दत :-

नगर पथविक्रेता समितीद्वारे विक्री प्रमाणपत्र धारण करणाऱ्या प्रत्येक पथविक्रेत्याला स्थानिक प्राधिकरणाने विहित केलेले शुल्क प्रदान केल्यावर, परिशिष्ट-३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यामध्ये ओळखपत्र किंवा स्मार्ट कार्ड देण्यात येईल.

**३.८.** विक्री प्रमाणपत्र / ओळखपत्र हरविल्यास किंवा गहाळ झाल्यास पथविक्रेता स्थानिक प्राधिकरणाकडे अर्ज करून व स्थानिक प्राधिकरणाने विहित केलेले शुल्क भरून विक्री प्रमाणपत्र / ओळखपत्र प्राप्त करून घेईल.

**३.९. विक्री प्रमाणपत्राची वैधता :-**

विक्री प्रमाणपत्राचा वैधता कालावधी, ते दिल्याच्या दिनांकापासून सुरुवातीस पाच वर्षांकरीता असेल. कायदेशीर वारसदारास हस्तांतरीत केलेल्या विक्री प्रमाणपत्रास, नवीन विक्री प्रमाणपत्र असा अन्वयार्थ लावला जाणार नाही.

## ४. शुल्क व आकार

**४.१. विक्रीशुल्क आणि शुल्क प्रदान न केल्याबाबत दंड :-**

i. स्थानिक प्राधिकरणाने वेळोवेळी ठरवून दिलेले पथविक्री शुल्क पथविक्रेत्यास अदा करावे लागेल.
ii. शुल्क प्रदानातील विलंबाकरीता स्थानिक प्राधिकरणाद्वारे निर्धारित करण्यात येणाऱ्या दराने दंड आकारण्यात येईल.
iii. स्थानिक प्राधिकरण, विक्रेत्याच्या प्रत्येक प्रवर्गानुसार वेगवेगळे शुल्क निश्चित करील. तसेच, विक्रीच्या जागेनुसार शुल्कात बदल करता येईल आणि विशेष क्षेत्रासाठी विशेष विक्री शुल्क विहित करता येईल.
iv. दिव्यांग, एकल महिला, विधवा महिला व तृतीयपंथीय पथविक्रेत्यास विक्री शुल्कात ५० टक्के सुट देण्यात येईल.
v. पुनर्स्थाननिश्चितीच्या बाबतीत पथविक्रेता विक्री प्रमाणपत्राच्या उर्वरित वैधता कालावधीमध्ये नव्या ठिकाणाचे / जागेचे शुल्क प्रदान करील.
vi. पथविक्रेत्याने देय दिनांकापर्यंत विक्री शुल्क भरण्यात कसूर केल्यास, नगर पथविक्रेता समिती स्थानिक प्राधिकरणाद्वारे ठरविण्यात येणाऱ्या कार्यपध्दतीनुसार विक्री शुल्काच्या वसुलीची कार्यवाही करील.

**४.२. अनुसूचित बँकांमार्फत शुल्क व दंड गोळा करणे :-**

विक्री प्रमाणपत्र प्राप्त पथविक्रेत्याकडून देय असलेल्या विलंबित प्रदानाचा दंड आणि किंवा कोणतेही अन्य आकार यांसह विक्री शुल्क गोळा करण्याची व्यवस्था स्थानिक प्राधिकरणामार्फत करण्यात येईल.

## ५. विक्री प्रमाणपत्राचे नुतनीकरण, निलंबन व रद्द करणे

**५.१. नगर पथविक्रेता समितीमार्फत विक्री प्रमाणपत्राचे नुतनीकरण :-**

i. विक्री प्रमाणपत्राचे दर पाच वर्षांनंतर नुतनीकरण करण्यात यावे.
ii. विक्री प्रमाणपत्राच्या नुतनीकरणासाठी शुल्क प्रदान करण्याची एक सुलभ प्रक्रिया असेल.
iii. नगर पथविक्रेता समिती विक्री प्रमाणपत्राच्या नुतनीकरणाच्या तारखा दोन महिन्यांच्या कालावधीत येणाऱ्या विक्रेत्यांची यादी तयार करील. सदर यादीत रक्कम व शुल्क भरण्याचे ठिकाण दर्शविण्यात येईल.
iv. विक्री प्रमाणपत्रावर पृष्ठांकन करुन नुतनीकरण करण्यात येईल.
v. नूतणीकरण शुल्क हे मुळ विक्री प्रमाणपत्राच्या शुल्का इतके असावे तथापि स्थानिक प्राधिकरण यामध्ये वाढ करू शकेल.
vi. कोणत्याही दंडाशिवाय नुतनीकरण शुल्क भरण्यासाठी एक महिन्याचा सवलतीचा कालावधी देण्यात येईल. विलंब कालावधीसाठी रुपये १५/-प्रति दिन इतका दंड आकारण्यात येईल. सदर कालावधी ३० दिवसाचा असेल.
vii. उपरोक्त कालावधीत विक्री प्रमाणपत्राच्या नुतनीकरणाचे शुल्क प्रदान करण्यात कसुर केलेल्या

पथविक्रेत्यांची यादी नगर पथविक्रेता समिती प्रसिध्द करेल.

viii. विक्री प्रमाणपत्राचे नुतनीकरण एकावेळी पाच वर्षांसाठी असेल.

**५.२. विक्री प्रमाणपत्राचे नुतनीकरण न करणे :-**

विहित कालावधीत विक्री प्रमाणपत्राचे नुतनीकरण न केल्यास, नगर पथविक्रेता समितीने यादी प्रसिध्द केल्यानंतर पथविक्रेत्याला त्याचे विक्री प्रमाणपत्र रद्द का करण्यात येऊ नये अशी कारणे दाखवा नोटीस बाजवण्यात येईल. सदर नोटिस दिल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत जर पथविक्रेत्याने नगर पथविक्रेता समितीला समाधानकारक खुलासा देण्यात कसूर केल्यास त्याचे विक्री प्रमाणपत्र रद्द करण्यात येईल.

**५.३. विक्री प्रमाणपत्राचे निलंबन करणे / रद्द करणे :-**

नगर पथविक्रेता समिती पुढील कारणांपैकी कोणत्याही कारणावरुन विक्री प्रमाणपत्राचे निलंबन करु शकेल किंवा ते रद्द करु शकेल :-

i. विक्रीच्या ठिकाणी अनाधिकृतपणे केलेला बदल.
ii. देय रक्कमांचे प्रदान न करणे.
iii. विक्री प्रमाणपत्राच्या अटी व शर्तीचे उल्लंघन करणे.
iv. विक्रीच्या स्थळाचा, परवानगी दिलेल्या जागेपेक्षा अधिक विस्तार करणे.
v. नियमबाहय वर्तन व शेजाऱ्यांना उपद्रव करणे.
vi. पथविक्रीचे प्रमाणपत्र देण्याच्या अर्जामध्ये दिशाभूल करणे.
vii. नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असलेल्या अपराधाची दोषसिध्दी झाल्यावर.
viii. FSSAI अंतर्गत नोंदणी न करता खाद्यपदार्थांवर प्रक्रिया करून त्यांची विक्री करत असल्याचे आढळल्यास.
ix. शासनाने निर्बंधित केलेल्या वस्तु, अंमली पदार्थ ई. विक्री करताना आढळल्यास.

**५.४. विक्री प्रमाणपत्राचे निलंबन करणे / रद्द करण्याची पध्दत**

कोणत्याही पथविक्रेत्याचे विक्री प्रमाणपत्र निलंबित करण्याची किंवा रद्द करण्याची पध्दत खालीलप्रमाणे असेल:-

i. नगर पथविक्रेता समिती अशा प्रकरणांची चौकशी करण्यासाठी प्राधिकृत अधिकाऱ्याची नेमणूक करेल.
ii. प्राधिकृत अधिकारी संबंधित प्रकरणाची शहानिशा करून नगर पथविक्रेता समितीला अहवाल सादर करेल. असा अहवाल सादर करण्यापूर्वी पथविक्रेत्यास त्याची बाजू मांडण्यासाठी वाजवी संधी देईल.
iii. अशा अहवालावर अंतिम निर्णय घेऊन विक्री प्रमाणपत्र निलंबन करणे / रद्द करण्याचा अधिकार नगर पथविक्रेता समितीला राहील.

**५.५.** किरकोळ भंग केल्यास नगर पथविक्री समिती पथविक्रीचे प्रमाणपत्र रद्द करण्याची अथवा त्याचे निलंबन करण्याची शिफारस करण्याऐवजी त्यास रुपये २०००/- पर्यंत दंड आकारील व समज देईल.

## ६. पथविक्रेत्यांना नवीन जागा देणे व त्याचे निष्कासन करणे

**६.१. पथविक्रेत्यांची पुनर्स्थान निश्चिती :-**

i. नगर पथविक्रेता समितीच्या शिफारशीनुसार स्थानिक प्राधिकरण शक्यतोवर सार्वजनिक हिताचे विकास प्रकल्प, सुरक्षाविषयक प्रश्न, वाहतुक कोंडी, साथीचे रोग पसरणे व नैसर्गिक आपत्ती / आरोग्याची इतर कारणे, क्षेत्राची स्वच्छता किंवा इतर कोणतेही वैध कारण यांसारख्या सार्वजनिक प्रयोजनांसाठी ना-विक्री प्रक्षेत्र आहे असे घोषित केल्यावरच केवळ पुनर्स्थान निश्चिती (स्थलांतरण) करण्यात येईल.

ii. सार्वजनिक हित व सार्वजनिक प्रयोजन या साठी विक्री क्षेत्र हे ना विक्री क्षेत्र घोषित झाल्यास त्या क्षेत्रातील बाधित पथविक्रेत्यांचे पुनर्स्थान (स्थलांतरण) करण्यासाठी विचार करण्यात येईल.

iii. अशा बाधित पथविक्रेत्यांना अशा पद्धतीने स्थलांतरीत करण्यात येईल ज्यामुळे त्यांची उपजीविका व राहणीमान उंचावेल किंवा किमान ते वास्तविक अर्थाने निष्कासनापूर्वीच्या पातळीवर पुनर्स्थापित होतील.

iv. नवीन पायाभूत सुविधा विकास प्रकल्पामुळे निर्माण झालेल्या उपजीविकेच्या संधीमध्ये बाधित पथविक्रेत्यांना सामावून घेतले जाईल. जेणे करून ते नवीन पायाभूत सुविधांमुळे निर्माण झालेल्या उपजीविकेच्या संधीचा लाभ घेतील.

v. अशा पथविक्रेत्यांना स्थलांतरित करीत असताना त्यांच्या सामानाचे नुकसान टाळले जाईल व काही नुकसान झाल्यास त्याची भरपाई केली जाईल.

vi. जमिनीवरील हक्क किंवा इतर स्वारस्य हस्तांतरित झाल्यासही त्या जमिनीवरील पथविक्रेत्यांचे विक्री करण्याबाबतचे हक्क अबाधित राहतील, आणि अशा हस्तांतरणामुळे आवश्यक असल्यास पुनर्वसन करावे.

vii. विक्री प्रमाणपत्रात नमूद केलेल्या जागेवरून स्थलांतरित होण्यासाठी, बाधित पथविक्रेत्याला त्याच्या संपर्क पत्त्यावर नोंदणीकृत टपालाने तीस दिवसांची नोटीस पाठवून, त्याच किंवा जवळपासच्या विक्री क्षेत्रात किमान तीन पर्याय दिले जातील. जर विक्री प्रमाणपत्रात नमूद केलेल्या त्याच प्रकारच्या विक्रीअंतर्गत तीन पर्यायी जागा उपलब्ध नसतील, तर बाधित पथविक्रेत्याला पथविक्रीच्या इतर श्रेणींमधून निवड करण्याचा पर्याय दिला जाऊ शकतो. एकापेक्षा जास्त विक्रेते एकाच पुनर्वसन स्थळाची निवड करत असल्यास, चिठ्ठी टाकून स्थळ निश्चित केले जाईल आणि अधिनियमाच्या कलम ४ च्या उप-कलम (३) अन्वये प्रदान केल्याप्रमाणे निवडलेली जागा न मिळालेल्या दुसऱ्या विक्रेत्याला दुसरी पर्यायी जागा वाटप केली जाईल.

**६.२. पथविक्रेत्याचे निष्कासन :-**

i. ज्या पथविक्रेत्याचे विक्री प्रमाणपत्र रद्द करण्यात आले आहे अशा कोणत्याही पथविक्रेत्याला निष्कासित करण्यापूर्वी ती जागा खाली करण्यासाठी आणि तेथे विक्री करणे बंद करण्यासाठी स्थानिक प्राधिकरण ३० दिवसांची नोटीस देईल.

ii. जर विक्रेत्याने नोटीस बजावण्यास नकार दिला किंवा नोटीस बजावणे व्यावहारिकदृष्ट्या शक्य नसेल, तर विक्रीच्या क्षेत्रातील ठळक ठिकाणी नोटीस चिकटवली जाईल आणि नोटीस बजावली गेली आहे असे मानले जाईल;

iii. ज्या पथविक्रेत्याने निष्कासनाच्या नोटिशीत नमूद केलेल्या कालावधीच्या समाप्तीनंतर जागा रिकामी केली नाही, असा पथविक्रेता प्रत्येक दिवसासाठी सदर दंड रु. २५०/- पेक्षा अधिक नसेल अशा रकमेचा भरणा करण्यास जबाबदार राहील.

iv. पथविक्रेत्याने स्वतःहून जागा रिकामी न केल्यास, स्थानिक प्राधिकरण त्याला त्या ठिकाणावरून प्रत्यक्ष हटविण्यासाठी प्रचलित कायद्यानुसार आवश्यक यंत्रणाचे सहाय्य घेईल. अशी निष्कासन कार्यवाही करण्याबाबत राज्य शासन सर्वंकष उपाययोजना करेल.

v. जी व्यक्ती विक्री प्रमाणपत्राशिवाय किंवा अनधिकृतरित्या विक्री करीत असल्याचे आढळून येईल व पथविक्रेता वाहतूक कोंडी, कायदा व सुव्यवस्थेची समस्या इत्यादी निर्माण करत असल्याचे आढळल्यास, अशा पथविक्रेत्यास स्थानिक प्राधिकरण ताबडतोब निष्कासित करेल.

### ६.३. स्थानिक प्राधिकरणाद्वारे माल जप्त करण्याची पद्धत:

जेथे कायद्याच्या कलम १९ च्या उपकलम (१) अंतर्गत पथविक्रेत्याचा माल जप्त करावयाचा असेल, तेथे खालील बाबींचा अवलंब करण्यात यावा.

i. ज्या पथविक्रेत्याचे विक्री प्रमाणपत्र अधिनियमाच्या कलम १० अन्वये रद्द केले आहे, किंवा जो विक्री प्रमाणपत्राशिवाय विक्री करतो किंवा जो विक्री-निषिद्ध क्षेत्रात विक्री करतो किंवा पथविक्रेत्याने निष्कासनाच्या नोटिशीत नमूद केलेल्या कालावधीच्या समाप्तीनंतर जागा रिकामी केली नाही, त्याला त्याच्या विक्रीच्या जागेवरून तात्काळ निष्कासित केले जाईल आणि त्याच्या विक्रीच्या वस्तू व माल स्थानिक प्राधिकरणाद्वारे जप्त करून त्यांच्या ताब्यात ठेवला जाईल. फक्त स्थानिक प्राधिकरणातील अधिकृत व्यक्तीच माल जप्तीची कारवाई करेल.

ii. जप्त केलेल्या मालाची यादी दोन प्रतींमध्ये तयार केली जाईल आणि यादीची दुसरी प्रत विक्रेत्याला दिली जाईल. जप्त केलेल्या मालाच्या प्रतीवर अधिकाऱ्याचे नाव, त्याचे पदनाम, कार्यालयाचा पत्ता आणि ज्या जागेवरून माल परत मिळवता येईल त्या जागेचा पत्ता नमूद केला जाईल. जप्ती मेमो नमूना परिशिष्ट ५ मध्ये आहे.

### ६.४. जप्त केलेला माल परत मिळवण्याची पद्धत आणि त्यावरील दंड:

i. नाशवंत मालाच्या बाबतीत जप्त केलेला माल सोडवण्यासाठीचा अर्ज, जप्तीच्या दिवशीच सादर करण्यास परवानगी असेल आणि नाशवंत नसलेल्या मालाच्या बाबतीत जप्तीच्या तारखेपासून ३

दिवसांच्या आत अर्ज सादर करता येईल. या कालावधीनंतर, जप्त केलेल्या मालावरील पथविक्रेत्यांचा हक्क संपुष्टात येईल आणि स्थानिक प्राधिकरणाला त्या मालाची विल्हेवाट लावण्याचा किंवा त्याचा लिलाव करण्याचा पूर्ण अधिकार असेल.

ii. पथविक्रेत्याने दावा केल्याच्या २४ तासांच्या आत जप्त केलेला नाशवंत माल आणि दोन कामकाजाच्या दिवसांच्या आत जप्त केलेला नाशवंत नसलेला माल, विहित शुल्क किंवा दंड भरून परत केला जाईल. जर कोणताही नाशवंत किंवा खाण्यायोग्य पदार्थ अस्वच्छ, खराब, सडलेली किंवा मानवी वापरासाठी अयोग्य असल्याचे आढळल्यास, स्थानिक प्राधिकरणाद्वारे दावा करणाऱ्याला कोणतीही भरपाई न देता ती नष्ट केली जाईल.

iii. विक्री प्रमाणपत्राशिवाय माल विक्रीच्या प्रकरणात, स्थानिक प्राधिकरणाने ठरविल्याप्रमाणे दंड पथविक्रेत्यास देय राहील.

## ७. विक्री प्रक्षेत्र

### ७.१. उपविधी व पथविक्रेता आराखडा :-

i. स्थानिक प्राधिकरण अधिनियमातील कलम ३७ मधील नमूद बाबीनुसार उपविधी तयार करेल.

ii. स्थानिक प्राधिकरण अधिनियमातील कलम २१ व अनुसूची एक नुसार नियोजन प्राधिकरण यांच्याशी सल्ला मसलतीने व नगर पथविक्रेता समितीच्या शिफारशीनुसार पथविक्रेता आराखडा तयार करेल.

iii. स्थानिक प्राधिकरण पथविक्रेता आराखडा मंजूरी साठी राज्य शासनाकडे सादर करेल. राज्य शासन पथविक्रेता आराखडा अधिसूचित करण्यापूर्वी पथविक्रेत्यांना लागू असलेल्या मानकांची खात्री करेल.

iv. आराखडा अधिसूचित झाल्यानंतर स्थानिक प्राधिकरण पथविक्रेता आराखड्याचा तपशिल स्थानिक प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांच्या स्थानिक प्राधिकरणाकरीता असलेल्या संकेतस्थळावर, स्थानिक प्राधिकरणाच्या सूचना फलकावर तसेच स्थानिक भाषेतील दोन वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द करील.

v. स्थानिक प्राधिकरण दर पाच वर्षांनी पथविक्रेता आराखडा तयार करेल.

### ७.२. विक्री प्रक्षेत्रे निर्धारित करण्याची तत्वे :-

i. स्वाभाविक बाजारांची ठिकाणे प्रथम विचारात घेण्यात येतील आणि स्थानिक प्राधिकरणाकडून लादण्यात येतील अशा शर्ती व निर्बंधांच्या अधीन राहून विक्री प्रक्षेत्रे म्हणून त्यांना परवानगी देण्यात येईल.

ii. पारंपारिकपणे आठवडे बाजार असणारी ठिकाणे तसेच रात्रीचे बाजार देखील विचारात घेण्यात येतील आणि आठवड्यातील विशिष्ट दिवशी व वेळी आणि स्थानिक प्राधिकरणाकडून लादण्यात येतील अशा शर्ती व निर्बंधांच्या अधीन राहून पथविक्रीसाठी त्यांना परवानगी देण्यात येईल.

iii. रस्त्यांची रुंदी, वाहतुकीचे प्रमाण व रस्त्यावरुन ये-जा करणाऱ्या पादचाऱ्यांची संख्या, धारण

क्षमता आणि रस्त्याचा वापर करणाऱ्या सर्वसाधारण जनतेची तसेच रहिवाशांची आणि अशा रस्त्यालगतच्या मालमत्तांमधून त्यांचा व्यवसाय चालविणाऱ्या व्यापाऱ्यांची किमान गैरसोय होईल किंवा अजिबात गैरसोय होणार नाही अशा मार्गाने उक्त प्रक्षेत्रे निश्चित करण्यासाठी महत्वाचे ठरतील असे अन्य घटक या आधारे विक्री प्रक्षेत्रे निश्चित करण्यात येतील.

iv. नगर पथविक्रेता समिती उत्सव अथवा जत्रा इत्यादीच्या काळात वैध असलेले पथ विक्रीचे तात्पुरते विक्री प्रमाणपत्र देऊ शकेल.

v. नगर पथविक्रेता समिती आरोग्य व सुरक्षितता यांच्याशी संबंधित असणाऱ्या विद्यमान कायद्याच्या तरतुदींची पूर्तता करण्याच्या अधीनतेने विक्रीच्या ठिकाणी खाद्य पदार्थांच्या दुकानांसाठी तात्पुरते विक्री प्रमाणपत्र देऊ शकेल.

vi. स्थानिक प्राधिकरण फॅशन गल्ल्या / फळे / भाजीपाला / फुले / अन्न / मासे / कृषी उत्पन्न बाजार इत्यादीच्या विशिष्ट प्रयोजनांसाठी समर्पित केलेली विक्री क्षेत्रे / प्रक्षेत्रे नेमून देऊ शकेल.

vii. संबंधित क्षेत्रावर नियंत्रण असणाऱ्या पोलिसांशी व वाहतुक पोलिसांशी विचारविनिमय करुन विक्री प्रक्षेत्राची निश्चिती करण्यात येईल.

viii. एखाद्या क्षेत्रामध्ये विक्री प्रक्षेत्र निश्चित केल्यामुळे बाधित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस नगर पथविक्रेता समितीकडे निवेदन करता येईल. सदर निवेदन प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत नगर पथविक्रेता समिती त्यावर विचार करील व ते निकालात काढील.

ix. ज्या नैसर्गिक बाजारांमध्ये फेरीवाले पन्नास वर्षांहून अधिक काळ व्यवसाय करत आहेत, त्यांना पारंपरिक बाजार (heritage market) घोषित करावे व अशा बाजारातील पथविक्रेत्यांचे स्थलांतर करू नये.

x. नागरिकांना पथविक्रेत्यांच्या वस्तु, सेवा व माल याची खरेदी करता येईल व रहदारीस अडथळा ठरणार नाही अशा पध्दतीने उभे स्टॉल्स, स्ट्रीट फूड हब, स्ट्रीट फ्रूट हब, स्ट्रीट फॅशन हब असे नावीन्यपूर्ण विक्री क्षेत्र, स्थानिक प्राधिकरण तयार करतील.

**७.३. खाजगी ठिकाणे विक्री प्रक्षेत्रे म्हणून नेमता येतील त्या शर्ती:-**

i. नगर पथविक्रेता समिती, जमीन मालकाद्वारे किंवा मालमत्ता मालकाद्वारे ना-हरकत प्रमाणपत्र सादर केल्यावर जमीन किंवा मालमत्तेच्या मालकाने किंवा यथास्थिती क्षेत्राच्या बाजार /निवासी कल्याण संघाने सादर केलेले खाजगी ठिकाण (जागा) विक्री प्रक्षेत्र, निर्बंधित विक्री प्रक्षेत्र किंवा ना-विक्री प्रक्षेत्र म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव विचारात घेईल.

ii. सुरक्षितता, सुरक्षा, रहदारीची स्थिती, सर्वसाधारण उपद्रवाचे कारण आणि निवासी कल्याण संघाची / बाजार संघाची मागणी हा खाजगी ठिकाणी विक्री करण्याचा मुख्य आधार असेल.

**७.४. वेळ विभागणीच्या आधारे विक्री करण्याची पध्दत-**

i. नगर पथविक्रेता समिती एखाद्या विशिष्ट प्रक्षेत्रासाठी जास्त मागणीवर अवलंबून असणाऱ्या वेळ विभागणीच्या आधारे विक्री करण्यासाठी विक्री प्रक्षेत्राची शिफारस करील.

ii. संबंधित क्षेत्रात सामावून घेतल्या जाऊ शकतील अशा विक्रीच्या जागांची संख्या आणि विक्रीच्या

ठिकाणांची संख्या आणि विक्रीच्या ठिकाणांची मागणी करणाऱ्या विक्रेत्यांची संख्या या आधारे प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर आठवडी बाजार / सप्ताहात बाजार भरविण्यात येईल.

iii. मध्यवर्ती व्यापार जिल्हे किंवा अशी स्थळे याठिकाणचा नियमित बाजार बंद झाल्यानंतर पथ विक्रेत्यास बाजार भरवता येऊ शकेल. नगर पथविक्रेता समिती आणि स्थानिक प्राधिकरण यांनी निश्चित केलेल्या यथोचित निर्बंधासह नामावली किंवा प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर संबंधित स्थानिक प्राधिकरण ठरवेल अशा वेळेपासून असा बाजार भरवला जाऊ शकतो.

**७.५. निर्बंधमुक्त / निर्बंधित / विक्रीस बंदी / वेळा विभागणीच्या आधारे विक्रीचे प्रक्षेत्र घोषित करण्याची कार्यपध्दती :-**

i. नगर पथविक्रेता समिती, विक्रीसाठी प्रस्तावित क्षेत्राचे सर्वेक्षण करण्याची व्यवस्था करील. त्यानंतर, नगर पथविक्रेता समिती दावे व हरकती यासाठी प्रस्ताव प्रसिद्ध करेल. त्याचबरोबर, सदर प्रस्ताव वाहतुक पोलिसांकडे आणि जमीन मालकी अभिकरणाकडे त्यांच्या अभिप्रायासाठी व अवलोकनासाठी पाठविल. वाहतुक पोलीस / जमीन मालकी अभिकरण शक्य असेल तेथे १५ दिवसांच्या आत अभिप्राय देईल.

ii. प्राप्त झालेले दावे आणि हरकती विचारात घेतल्यानंतर नगर पथविक्रेता समिती आपल्या अभिप्रायासह स्थानिक प्राधिकरणाकडे प्रस्ताव पाठविल. स्थानिक प्राधिकरण नियोजन प्राधिकरण यांच्याशी सल्ला मसलत करून विक्री क्षेत्र आराखडा तयार करेल.

**७.६. विक्री प्रक्षेत्राची धारण क्षमता निर्धारित करण्यासाठी तत्वे :-**

i. स्थानिक प्राधिकरणाच्या अखत्यारीतील क्षेत्रांचे स्पष्टपणे सीमांकन आणि सर्वेक्षण करण्यात येईल व शक्य असल्यास डिजिटल नकाशा काढण्यात येईल.

ii. सार्वजनिक उपयोगाच्या कामासाठी पुरेशी जागा सोडणे आणि पादचारी / वाहनांना ये-जा करण्यासाठी पुरेशी जागा सोडण्याची मुभा असेल.

iii. एका स्थिर / फिरत्या विक्रत्यासाठी १ मी X १ मी किंवा त्यापटीत जागेचा विचार करण्यात येईल.

iv. उपरोक्त आधारे आणि शहराच्या लोकसंख्येच्या २.५ % (अडीच टक्के) यास पुष्टी देणाऱ्या मानकास अधीन राहून आणि पथविक्री आराखड्यानुसार, जितकी संख्या विक्री प्रक्षेत्र सामावून घेऊ शकेल तितक्या पथविक्रेत्यांच्या संख्येची गणना करण्यात येईल. परवानगी दिलेल्या पाळ्यांची संख्या, काल-विभागणी व्यवस्थेद्वारे निर्धारित करता येईल आणि त्यानुसार धारण क्षमता निर्धारित करण्यात येईल.

**७.७. विक्री-बंदी क्षेत्र: खालील क्षेत्रे विक्री-बंदी क्षेत्र म्हणून घोषित केली जावीत.**

i. मंत्रालय, विधानमंडळ, उच्च न्यायालय, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषदेची कार्यालये, पोलिस आयुक्तालय, महानगरपालिका किंवा नगरपरिषद, नगरपंचायती कार्यालय, न्यायालये, छावणी मंडळ, अग्निशमन दलाची केंद्रे, शासकीय सामान्य रुग्णालये इत्यादी महत्त्वाच्या शासकीय इमारतींच्या प्रवेश आणि बाहेर पडण्याच्या ठिकाणांपासून किमान १०० मीटर

अंतरावर.

ii. रेल्वे स्थानकांपासून किमान १५० मीटर अंतरावर.

iii. शहराच्या हद्दीत येणाऱ्या रेल्वे क्रॉसिंगच्या दोन्ही बाजूंना किमान १०० मीटर, मध्यवर्ती बसस्थानकाच्या प्रवेश आणि निर्गमन बिंदूंपासून किमान १०० मीटर अंतरावर.

iv. प्राचीन स्मारके आणि पुरातत्व स्थळे आणि अवशेष अधिनियम २०१० आणि राज्य पुरातत्व स्मारक संरक्षण अधिनियम यांच्या संबंधित तरतुदींमध्ये विहित केल्यानुसार क्षेत्रे.

v. वारसा संवर्धन नियमांच्या तरतुदींनुसार प्रतिबंधित केलेली क्षेत्रे.

vi. प्रार्थना स्थळापासून किमान १०० मीटर अंतरावर, परंतु प्रार्थना स्थळांबाहेर भाविकांना आवश्यक असलेल्या वस्तु विक्री करणाऱ्या पथविक्रेत्यांना मर्यादित परवानगी देता येईल.

## ८. संकीर्ण

### ८.१. राज्यस्तरीय समन्वयन अधिकारी

आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय हे राज्यस्तरीय समन्वयन अधिकारी म्हणून काम पाहतील. नगर पथविक्रेता समितीने/ स्थानिक प्राधिकरणाने उपस्थित केलेल्या कोणत्याही मुद्यावर निर्णय घेतील किंवा नगर पथविक्रेता समितीने संमत केलेला कोणताही ठराव स्वाधिकारे मागवून त्यावर विचार करता येईल. आवश्यकतेनुसार राज्यस्तरीय बैठका आयोजित करतील.

### ८.२. अभिलेखे जतन करणे

१) नगर पथविक्रेता समितीद्वारे खालील अद्ययावत नोंदी डिजिटल व मुद्रित स्वरूपात ठेवल्या जातील:-

i. पथविक्रेत्यांची नोंदणी
ii. विक्री प्रमाणपत्र जारी केले (तपशिलांसह)
iii. पथविक्रेत्यांची प्रतीक्षा यादी - ज्यांना विक्री प्रमाणपत्र जारी केलेले नाही
iv. धारण क्षमता असलेल्या सर्व विक्री क्षेत्रांची यादी
v. उपलब्ध जागा (विक्री क्षेत्रानुसार)
vi. सभेची नोंद आणि इतिवृत्त
vii. नगर पथविक्रेता समितीचे ठराव
viii. उपस्थिती नोंदवही
ix. मानधन नोंदवही
x. रोख पुस्तक आणि सामान्य खातेवहीची नोंदवही
xi. विक्री प्रमाणपत्र निलंबन किंवा रद्द केल्याची नोंदवही
xii. सामाजिक अंकेक्षण अहवाल, प्रचारात्मक उपाययोजना आणि जनजागृती मोहिमांच्या नोंदी
xiii. नगर पथविक्रेता समितीच्या सदस्यांच्या वैयक्तिक नस्ती
xiv. पथविक्रेता नियम २०१६ मध्ये नमूद केलेल्या इतर सर्व बाबी

xv. नाकारण्यात आलेल्या अर्जदारांची नोंदणी
xvi. पथविक्रेता सर्वेक्षणाचा तपशील
xvii. प्रत्येक पथविक्रेत्याच्या वैयक्तिक नस्ती
xviii. नियम, योजना, परिपत्रके, ठराव, मार्गदर्शक तत्त्वे आणि सूचना
xix. निर्बंधमुक्त, प्रतिबंधित आणि विक्री-बंदी क्षेत्रांची यादी
xx. वेळ-वाटप तत्त्वावरील विक्री क्षेत्रांची यादी
xxi. नगर पथविक्रेता समिती किंवा इतर समित्यांच्या सर्व खर्चाची नोंद
xxii. अधिनियम व नियमामध्ये नमूद बाबी

२) स्थानिक प्राधिकरणाद्वारे खालील अद्ययावत नोंदी डिजिटल स्वरूपात ठेवल्या जातील:-

i. पथविक्रेता निवडणूक संबंधित माहिती
ii. अधिसूचित नगर पथविक्रेता समिती
iii. उपविधी
iv. नगर पथविक्रेता आराखडा
v. पथविक्रेत्यांचे अर्ज, अपील
vi. तक्रार व विवाद निर्णय समितीचे दस्तावेज
vii. अपील प्राधिकरणाचे दस्तावेज
viii. विक्री शुल्क माहिती : मागणी आणि वसुली नोंदवही;
ix. दंडाबाबतची माहिती
x. माल व वस्तू जप्त व परत केल्याची माहिती
xi. स्थलांतरीत व निष्कासित पथविक्रेत्यांची माहिती
xii. स्थानिक प्राधिकारणाचे अनुषंगिक ठराव
xiii. अधिनियम, नियम, शासन निर्णय, परिपत्रके, पत्र
xiv. पथविक्रेता नियम २०१६ मधील नमूद बाबी

३) राज्यस्तरीय समन्वयन अधिकारी खालील अद्ययावत नोंदी इलेक्ट्रॉनिक स्वरूपात ठेवल्या जातील:-

i. अधिनियम, नियम, योजना
ii. अधिसूचित नगर पथविक्रेता समिती यादी
iii. तक्रार व विवाद निवारण यंत्रणा यादी

**८.३. इतर बाबी:-**

i. कोणत्याही जुन्या योजनेअंतर्गत विक्रीची परवानगी देण्यात आली आहे अशा सर्व व्यक्तींना या योजनेच्या तरतुदी लागू असतील. या योजनेनुसार अपात्र असतील अशा कोणत्याही व्यक्तीस स्थळावरुन / जागेवरुन तात्काळ निष्कासित करण्यात येईल.

ii. यापूर्वीच्या कोणत्याही जुन्या योजनेअंतर्गत सार्वजनिक रस्ते / सार्वजनिक जागा याठिकाणी वाटप झालेल्या जागेवर विक्रेत्याने कोणतीही स्थिर संरचना / बांधकाम केलेले असल्यास,

विक्रेत्याने ते निष्कासित करुन जागा पूर्णत: मोकळी करणे आवश्यक आहे आणि विक्रेता योजनेतील तरतुदींनुसार विक्री करील.

iii. भोगवटादारांच्या अपात्रतेमुळे रिकाम्या किंवा मोकळ्या झालेल्या जागा प्रतिक्षा यादीसाठी अन्य पात्र नोंदणीकृत पथविक्रेत्यांना वाटप करण्यासाठी स्थानिक प्राधिकरणास विचारात घेता येतील.

**८.४. पायाभूत सुविधेमध्ये सुधारणा, प्रशिक्षण व कौशल्य विकास आणि आर्थिक सहाय्य:-**

८.४.१. पथविक्रेते व इतर हितसंबंधित व्यक्ती यांच्याशी विचारविनिमय करुन विद्यमान बाजारपेठांमध्ये शौचालये, कचरा विल्हेवाट सुविधा, प्रकाश योजना, यांसारख्या मुलभूत सेवांच्या सुधारणेसाठी स्थानिक प्राधिकरणामार्फत सहाय्य करण्यात येईल.

८.४.२. पथविक्रेत्यांचे हक्क व जबाबदाऱ्या, त्यांच्याशी सबंधित धोरणे, कायदे व योजना, अन्न सुरक्षा, आरोग्य राखणे, कचऱ्याची विल्हेवाट यांसारख्या बाबींवर पथविक्रेत्यांचे दिशानिदेशन करण्याच्या हेतूने सर्व पथविक्रेत्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम स्थानिक प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात येईल.

८.४.३. स्थानिक प्राधिकरण पथविक्रेत्यांचे सामाजिक व वित्तीय समावेशन करण्यासाठी खालील तरतुदी करेल.

i. नगर पथविक्रेता समितीचे अधिनियम, नियम व योजनाबाबत प्रशिक्षण आयोजित करण्यात येईल.
ii. पथविक्रेत्यांचे सामाजिक - आर्थिक प्रोफाईलिंग करण्यात येईल.
iii. पथविक्रेत्यांचे वित्तीय, डिजिटल व अन्न सुरक्षाबाबत प्रशिक्षण आयोजित करण्यात येईल.
iv. पथविक्रेत्यांना केंद्र व राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सहाय्य करेल.
v. पथविक्रेत्यांना व्याज अनुदान आधारित बँकेकडून कर्ज उपलब्ध करण्यासाठी सहाय्य करेल.
vi. पथविक्रेत्यांना डिजिटल व्यवहारास प्रोत्साहन देण्यात येईल.
vii. पथविक्रेत्यांना क्रेडिट कार्ड सुविधा मिळण्यासाठी सहाय्य करण्यात येईल.
viii. पथविक्रेत्यांना केंद्र व राज्य शासनाच्या विमा योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सहाय्य करेल.

**८.५. सामाजिक अंकेक्षण**

८.५.१. नगर पथविक्रेता समिती स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने पथविक्रेता अधिनियम, नियम व योजनानुसार अंमलबजावणीचे सामाजिक अंकेक्षण दर दोन वर्षात एकदा करेल.

८.५.२. स्थानिक प्राधिकरण स्वयंसेवी संस्थेची पारदर्शक पद्धतीने निवड प्रक्रिया करेल. सामाजिक अंकेक्षण करण्यासाठी स्थानिक प्राधिकरणाद्वारे खर्चाची तरतूद करण्यात येईल.

८.५.३. स्वयंसेवी संस्था सामाजिक अंकेक्षणासाठी विविध पध्दतींचा उपयोग करेल उदाहरणार्थ:

फोकस ग्रुप डिस्कशन, प्रत्यक्ष निरीक्षण, प्रश्नावली भरून घेणे, दस्ताऐवज इत्यादि.

८.५.४. स्थानिक प्राधिकरणाने दिलेल्या निर्धारित वेळेत स्वयंसेवी संस्था खालील मुद्यांबाबत सामाजिक अंकेक्षण करेल

i. पथविक्रेत्याचे सर्वेक्षण, नोंदणी, विक्री प्रमाणपत्र व तात्पुरते विक्री प्रमाणपत्र
ii. पथविक्रेत्यांसाठी योजना व आराखडा आणि त्याची अंमलबजावणी
iii. पथविक्रेत्यांची सनद
iv. अधिनियम, नियम आणि योजनेच्या अंमलबजावणीची स्थिती
v. शासन आणि स्थानिक प्राधिकरणास सादर केलेले विवरणपत्र
vi. नगर पथविक्रेता समितीने आयोजित केलेल्या सभेचा ठराव आणि इतिवृत्त
vii. नगर पथविक्रेता समितीसमोर दाखल केलेल्या अर्जाची नोंद आणि त्यांचा निपटारा
viii. स्थानिक प्राधिकरणासमोर दाखल केलेल्या अर्ज / अपीलांची नोंद आणि त्यांचा निपटारा
ix. तक्रार निवारण समितीसमोर आणलेल्या सर्व तक्रारी किंवा विवादांची नोंद आणि त्यांचा निपटारा
x. सामाजिक अंकेक्षण कालावधीतील स्थलांतर आणि निष्कासनांची एकूण संख्या, तपशील आणि मालाची जप्ती याची नोंद.
xi. निर्बंधमुक्त किंवा प्रतिबंधित किंवा विक्री नसलेल्या किंवा वेळ-वाटप तत्त्वावरील क्षेत्रांची यादी.
xii. सामाजिक अंकेक्षण कालावधीत समाविष्ट केलेली विक्री क्षेत्रे आणि बाजारपेठा
xiii. सामाजिक अंकेक्षण कालावधीत वसूल केलेल्या आणि जमा केलेल्या शुल्क आणि दंडाचा तपशील
xiv. नगर पथविक्रेता समिती आणि स्थानिक प्राधिकरणाद्वारे राबविण्यात येणारे कल्याणकारी कार्यक्रम, क्षमता बांधणी कार्यक्रम, विक्रेता व्यवसाय वृद्धी कार्यक्रमांवरील खर्च आणि त्याचा सामाजिक व आर्थिक परिणाम
xv. मागील सामाजिक अंकेक्षण अहवाल( असल्यास), अधिनियम, नियम आणि योजनेची अधिक चांगल्या प्रकारे अंमलबजावणी करण्यासाठी नगर पथविक्रेता समितीला आवश्यक वाटेल अशी इतर कोणतीही संबंधित माहिती.

८.५.५. सामाजिक अंकेक्षणाचा उद्देश हा पथविक्रेत्यांच्या लाभाचे मूल्यमापन करणे असेल व त्याद्वारे सुधारणा करण्यासाठीच्या उपाययोजना पुढे येतील.

८.५.६. स्वयंसेवी संस्था सामाजिक अंकेक्षणाचा अहवाल नगर पथविक्रेता समिती व स्थानिक प्राधिकरणास सादर करेल. सामाजिक अंकेक्षण अहवालामधून पुढे आलेल्या त्रुटींची त्वरित पूर्तता करण्याची जबाबदारी नगर पथविक्रेता समिती व स्थानिक प्राधिकरण यांची राहील.

---

## परिशिष्ट - १

## पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम, २०१४ नुसार

## नमुना - १ [कलम ३(१)]

## सर्वेक्षण प्रश्नावली नमूना

| सर्वेक्षणातील बाबी | सर्वेक्षणाचा तपशील |
|---|---|
| आधार क्रमांक | |
| पथविक्रेत्याचे नांव | आधार कार्डमध्ये नमूद असल्याप्रमाणे |
| पती / वडिलांचे नाव | |
| जन्मदिनांक | आधार कार्डमध्ये नमूद असल्याप्रमाणे |
| लिंग | महिला /पुरुष/इतर |
| निवासी पत्ता | आधार कार्डमध्ये नमूद असल्याप्रमाणे |
| सध्या राहत असलेला पत्ता | |
| संपर्क क्रमांक | |
| वैवाहिक स्थिती | अविवाहित / विवाहित / घटस्फोटित / विधवा |
| जातीचा प्रवर्ग | अजा / अज / इमाव/ लागू नाही |
| अल्पसंख्याक आहात का? | होय / नाही /लागू नाही |
| एकल महिला | होय/नाही /लागू नाही |
| दिव्यांग | • होय / नाही/ लागू नाही<br>• (असल्यास) दिव्यांगत्वाचे प्रमाण / लागू नाही |
| पथविक्रेत्याचे आणि कुटुंबाचे छायाचित्र | |
| विक्रीचा प्रमुख प्रवर्ग | अ. कौशल्य / सेवा विक्री<br>ब. वस्तु व माल विक्री |
| विक्रीचा उपवर्ग | स्थिर / स्थिर विक्रेता (अंशकालिक किंवा वेळ-वाटणी पद्धतीने)/ फिरता विक्रेता (मोटार वाहनासह)/ फिरता विक्रेता (मोटर नसलेले वाहन)/फिरता विक्रेता (डोक्यावरचा माल)/हंगामी/ इतर (तपशील नमूद करावा) |
| व्यवसायाची वेळ | |
| पथविक्रेत्यासह विक्री ठिकाणाचे छायाचित्र | मोबाईल ॲपद्वारे छायाचित्र घेणे आणि अपलोड करणे |
| विक्री ठिकाणचा पत्ता | • Geo tagging/Geo Fencing मोबाईल ॲपद्वारे माहिती प्राप्त करणे<br>• ठिकाण --प्रभाग क्रमांक ---/ रस्त्याचे नांव ----/ महत्वाचे ओळख ठिकाण ----- |
| विक्री प्रक्षेत्राचा प्रकार | निवासी / वाणिज्यिक / औद्योगिक / बाजार / स्थानक आणि इतर (उल्लेख करावा) |
| व्यवसायाचे स्वरुप | उल्लेख करावा |
| पत्नी /पतीचे नाव | |
| अवलंबून असलेल्या मुला/मुलींची नावे | नाव लिंग वय<br>१. |

## परिशिष्ट - २

### पथविक्रेता (उपजीविका, संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम, २०१४ नुसार

### नमुना - २ [कलम ६(२)]

### विक्री प्रमाणपत्राचा नमुना

**पथविक्रेत्याचे छायाचित्र**

- सर्वेक्षणातील युनिक नोंदणी क्रमांक:
- विक्री प्रमाणपत्र क्रमांक:

१. पथविक्रेत्याचे नांव : आधार कार्डमध्ये नमूद असल्याप्रमाणे

२. जोडीदाराचे नाव किंवा अवलंबून असलेल्या अपत्याचे नांव :
(पथविक्रेत्याबरोबर व्यवसाय करीत असल्यास)

३. जन्मदिनांक : आधारकार्डानुसार

४. लिंग: आधारकार्डानुसार

५. पथविक्रेत्याचा निवासी पत्ता : आधारकार्डानुसार

६. विक्रीचा प्रमुख प्रवर्ग: अ. कौशल्य किंवा सेवा विक्री / ब. वस्तु व माल विक्री
(वरील पैकी खात्री करून एक प्रवर्ग निश्चित करावा.)

७. पथविक्रेत्याची वर्गवारी :

अ. स्थिर विक्रेता

i. स्थिर (पूर्णवेळ)

ii. स्थिर (अंशकालिक किंवा वेळ-वाटणी पद्धतीने)

ब. फिरता विक्रेता

i. फिरता विक्रेता (मोटार वाहनासह)

ii. फिरता विक्रेता (मोटर नसलेले वाहन)

iii. फिरता विक्रेता (डोक्यावरचा माल)

कुटुंबाचे छायाचित्र

८. पथविक्रेत्यांची इतर/ हंगामी वर्गवारी

(i) आठवडी बाजारातील विक्रेते

(ii) वारसा (Heritage) बाजारांमधील विक्रेते

(iii) रात्रीच्या बाजारातील विक्रेते

(iv) उत्सव बाजार किंवा कार्यक्रमांमधील तात्पुरते विक्रेते.

(v ) इतर -------

(उपरोक्त क्र . ७ व ८ वर्गवारी पैकी खात्री करून एक वर्गवारी निश्चित करून नमूद करावी)

९. व्यवसायाचा प्रकार:

१०. विक्री प्रक्षेत्र क्रमांक व ठिकाण:

११. फिरत्या विक्रेत्याच्या बाबतीत विक्री ठिकाण / क्षेत्राचा तपशील :

१२. विक्री प्रमाणपत्र जारी केल्याचा दिनांक :

१३. प्रमाणपत्राचा वैधता कालावधी :

१४. विक्रीचे दिवस व वेळ :

दिनांक : नगर पथविक्रेता समिती अध्यक्ष स्वाक्षरी

विक्री प्रमाणपत्र हे खालील नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

१. पथविक्रेता, विक्रीच्या ठिकाणी विक्री प्रमाणपत्र ठळकपणे लावील. विक्रेता, विक्री करण्याच्या संपूर्ण कालावधीमध्ये ओळखपत्र सुध्दा जवळ बाळगील.
२. विक्रीकरीता निश्चित केलेल्या कालावधीमध्येच विक्री करता येईल.
३. विक्री प्रमाणपत्र हे अहस्तांतरणीय असेल आणि कोणत्याही परिस्थितीत ते मक्त्याने, भाडेपट्टयाने देता येणार नाही, त्याची विक्री किंवा हस्तांतरण करता येणार नाही.
४. जागेवर कोणत्याही प्रकारच्या तात्पुरत्या / कायमस्वरुपी संरचना / बांधकाम करण्यास परवानगी असणार नाही.
५. पथविक्रेत्याने त्याला वाटप केलेल्या जागेतच सर्व विक्रीचा माल ठेवला पाहिजे.
६. विक्रीच्या जागेवर कोणतेही प्रक्षेपण करण्यास, विस्तार करण्यास परवानगी असणार नाही. तथापि, जमिनीवर किंवा भिंतींवर कायमस्वरुपी बांधलेल्या नसतील अशा छत्र्या /छपऱ्या यांचा वापर विक्रेते करु शकतात.
७. ज्याला विक्री प्रमाणपत्र देण्यात आले आहे अशा विक्रेत्याला स्थानिक प्राधिकरणाने विहित केलेले मासिक विक्री शुल्क देणे आवश्यक असेल.
८. विनिर्दिष्ट कालावधीमध्ये कोणत्याही कारणास्तव विक्री करण्याची असमर्थता हे विक्रीचे मासिक शुल्क प्रदान न करण्याचे किंवा सूट मिळण्याचे कारण ठरणार नाही.
९. कोणत्याही परिस्थितीत पथविक्रेता विक्रीची जागा पोट भाडेपट्टयाने देणार नाही.
१०. लोकहितास्तव पथ विक्रेत्यावर निर्बंध घालण्याचा, त्याला निष्कासित करण्याचा किंवा विस्थापित करण्याचा हक्क स्थानिक प्राधिकरणाकडे निहित असेल. पथविक्रेता नोटीस मिळाल्यानंतर तात्काळ जागा रिकामी करील.
११. विक्रेता विक्री प्रक्षेत्रातील / क्षेत्रातील कचऱ्याची एकत्रितपणे विल्हेवाट लावण्याकरीता चालना देण्यास योगदान देईल. विक्रेता कोणताही कचरा गटारात, रस्त्याच्या कडेला, खुल्या क्षेत्रात किंवा अन्य कोणत्याही अनधिकृत ठिकाणी रचून ठेवणार नाही.
१२. विक्रेता त्यांना नेमून दिलेल्या जागेचाच वापर करील आणि रहदारी किंवा पादचारी किंवा बिगर यांत्रिक वाहने यांच्या सुरळीत वाहतुकीमध्ये कोणताही अडथळा आणणार नाही.
१३. विक्रेता उपद्रवी, धोकादायक व प्रदुषणकारी वस्तु विकणार नाही. उत्पादनाचा व जनतेला देण्यात येणाऱ्या सेवांचा दर्जा, सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता व सुरक्षितता यासाठी निर्धारीत केलेल्या मानकांनुसार असल्याची सुनिश्चिती विक्रेता करेल.
१४. विक्रीची परवानगी रद्द केल्यावर / समाप्त झाल्यावर पथविक्रेता ती जागा शांततापूर्ण रीतीने तात्काळ रिकामी करील.
१५. अन्न व पदार्थ विक्री करणारे पथविक्रेता अन्न सुरक्षाबाबत FSSAI च्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करेल व FSSAI चे वेळोवेळी अन्न सुरक्षतेबाबतचे प्रशिक्षण पूर्ण करेल.
१६. विक्री प्रमाणपत्र हरवल्यास नगर पथविक्रेता समितीस निर्दशनास आणून द्यावे.
१७. सदर विक्री प्रमाणपत्र जारी केल्याच्या दिनांकापासून पाच वर्ष वैध राहील.
१८. उपरोक्त अटी व शर्तीचे उल्लंघन करणारा व याचा गैरवापर करणारा पथविक्रेता दंडात्मक कारवाईस पात्र राहतील.

QR Code

## परिशिष्ट - ३

पथविक्रेता (उपजीविका, संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम, २०१४ नुसार

नमुना - ३

[कलम ६(३)]

ओळखपत्राचा नमुना

**पथविक्रेत्याचे छायाचित्र**

१ ओळखपत्र क्रमांक : ००००००
२ नाव :
३ विक्री प्रमाणपत्राचा क्रमांक व दिनांक :
४ विक्रीचे ठिकाण- विक्री प्रक्षेत्र क्रमांक व ठिकाण:
(QR code अंतर्भूत)
५ निवासी पत्ता:
६ पथविक्रेत्याची वर्गवारी :
७ व्यवसायाचा प्रकार :
८ भ्रमणध्वनी क्रमांक :
९ जारी केल्याचा दिनांक :
१० वैधता (पर्यंत) :

**दिनांक :**

नगर पथविक्रेता समिती अध्यक्ष स्वाक्षरी

नोट :

१. ओळखपत्राची वैधता जारी केल्याच्या / / तारखेपासून ते / / तारखे पर्यंत लागू आहे.
२. ओळखपत्र हरवल्यास नगर पथविक्रेता समितीस निर्दशनास आणून द्यावे.
३. हे ओळखपत्र पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री विणीयमन) अधिनियम २०१४ मधील कलम ६ (३) अंतर्गत असलेल्या अटीच्या आधारावर जारी केले आहे.

## परिशिष्ट - ४

### पथविक्रेता (उपजीविका, संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम, २०१४ नुसार

### नमूना - ४

### [कलम ५ (१)]

### पथविक्रेत्याचे स्वयंघोषणा पत्र नमूना

मी श्री / श्रीमती ------------------------ वडिलांचे/पतीचे नाव ------------------------------------
वय : ------------ पत्ता : -----------------------------------------------------------------------
वास्तव्य करीत आहे. मी -------------------- महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत मधील ------
---------------------------या ठिकाणी ---------------------------- व्यवसाय करतो. खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार विक्री प्रमाणपत्र व ओळखपत्र मिळण्यासाठी मी याद्वारे खालील प्रमाणे स्वयंघोषणा पत्र देत आहे.

१. मी स्वत: किंवा माझ्या कुटुंबातील सदस्यांमार्फत विक्री करेल, ज्यांचे वय अठरा वर्षांपेक्षा कमी नसेल.
२. माझ्या कुटुंबाकडे पथविक्रीशिवाय उपजीविकेचे दुसरे कोणतेही साधन नाही व इतर कोणत्याही ठिकाणी दुसरे कोणतेही पथविक्री करीत नाही
३. मला देण्यात आलेली विक्री व्यवसायांशी संबंधित जागा, भाडे किंवा विक्री प्रमाणपत्र कोणत्याही प्रकारे इतर कोणत्याही व्यक्तीला हस्तांतरित करणार नाही किंवा त्याचा ताबा देणार नाही.
४. मी कोणत्याही संसर्गजन्य रोगामुळे बाधीत नाही.
५. मी विक्रीच्या जागेवर / प्रक्षेत्रात व आजुबाजूच्या क्षेत्रात स्वच्छता व सार्वजनिक आरोग्य राखील.
६. पथविक्रेता योजनेमध्ये विक्री प्रमाणपत्र प्रदान करणे, विक्री प्रमाणपत्राचे निलंबन व रद्द करण्याबाबत दिलेल्या तरतुदी मला मान्य आहेत व त्याचे मी पालन करेन.

वरील मुद्यांमध्ये नमूद केल्याप्रमाणे समजून व वाचून मी स्वता: सही / अंगठा केलेला आहे.

पथविक्रेत्याचे सही / अंगठा

(पथविक्रेत्याचे नाव)

**परिशिष्ट - ५**

**नमूना - ५**

**[मुद्दा क्रमांक ६.३ (ii) पहा ]**

**संबंधित स्थानिक प्राधिकरणाचे नाव**

**अनधिकृत विक्रेते/विक्री प्रमाणपत्राच्या अटी व शर्तीचे उल्लंघन केल्याने विक्री स्थळांवरून जप्त केलेल्या वस्तु व मालाची जप्ती नोंद**

मेमो क्र. दिनांक ...........

खालील माल/वस्तू, श्री ------------------------------------वडिलांचे /पतीचे नाव---------------- राहणार ------------------------------------------ ---संपर्क क्रमांक -------------------------------- यांच्याकडून, दिनांक ----/-------/----------- रोजी, वेळ---------------- या वेळी, स्थळ ---------- ------------------------------------- येथून, विक्री प्रमाणपत्राच्या अटी व शर्तीमधील ------------- ------------------------------------------------------याचे उल्लंघन करून /ना विक्री क्षेत्रात / अनधिकृतपणे विक्री करत असल्याचे आढळल्यामुळे खालील प्रमाणे वस्तु व माल जप्त करण्यात आला.

(अ) वस्तूंचे व मालाचे वर्णन आणि प्रमाण (नाशवंत व नाशवंत नसलेले)

I. ------------------------------------------------------------------------------------------

II. ------------------------------------------------------------------------------------------

III. ------------------------------------------------------------------------------------------

IV. ------------------------------------------------------------------------------------------

V. ------------------------------------------------------------------------------------------

(ब) विक्रेत्याला कळविण्यात येते की, तो/ती माल उचलण्याचा खर्च आणि साठवणुकीचा खर्च भरल्यानंतर, नाशवंत मालासाठी २४ तासांच्या आत आणि अनाशवंत मालासाठी ३ दिवसांच्या आत अर्ज करून, कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत ---------------------------या स्टोअर/गोदाम ठिकाणी जप्त केलेला माल/वस्तू परत मिळवू शकतो/शकते, त्यानंतर विक्रेत्याला कोणतीही भरपाई न देता किंवा सूचना न देता जप्त केलेल्या मालाची विल्हेवाट लावली जाऊ शकते किंवा त्याचा लिलाव केला जाऊ शकतो.

(क) नाशवंत मालाच्या बाबतीत अर्ज दाखल केल्याच्या एका दिवसाच्या आत आणि अनाशवंत मालाच्या बाबतीत अर्ज केल्याच्या २ दिवसांच्या आत रु. ------------ दंड भरून माल परत मिळवता येईल, त्यानंतर कोणताही दावा विचारात न घेता योग्य वाटेल त्या पद्धतीने मालाची विल्हेवाट लावण्याचा स्थानिक प्राधिकरणाचा अधिकार राहील.

| | | |
|---|---|---|
| निरीक्षकाची सही ------ | पथ विक्रेत्याची सही ...... | साक्षीदाराची स्वाक्षरी.. |
| निरीक्षकाचे नाव.व पद ..<br>कार्यालयाचा पत्ता | पथविक्रेत्याचे नाव.. | साक्षीदाराचे नाव व पद |

ठिकाण : ---------

तारीख: ------